

७६६०९
३०।३।०७
३६५७
नोंद क्रं १२५६२

# गांधी-चित्र-कथा

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १२५६२ नों दि ..........
वि. बा. वा. .. क्र. ........

लेखिका-कलाकार

सरलादेवी मुझुमदार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे वाचनालय शाखा
अनुक्रम ७६६०९... वि बा. वा.
क्रमांक ३६५७...नोंद दि...३०।३।०७

IRBK-0112572

अनुवादक

श्री दा. न. शिखरे एम्.ए.
संचालक - महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे.

# प्रकाशकाची भूमिका

म. गांधींची जन्म-शताब्दि ता. २ ऑक्टोबर १९६९ रोजी आहे. ही शताब्दि योग्य तऱ्हेनें कशी साजरी करावी, हा प्रश्न भारतांतील सर्व कार्यकर्त्यांपुढें आणि मध्यवर्ती व राज्य सरकारापुढें, १९६४ सालापासून उभा आहे. गांधीजींचा जन्मदिन, त्यांच्याच सूचनेनुसार, "चरखा-जयंति" म्हणून नेहमीं साजरा केला जातो. त्याचप्रमाणे, या शंभराव्या जयंतीचे कार्यक्रम म्हणून निरनिराळी राष्ट्र-संवर्धक, विधायक कार्ये राष्ट्रीय व राज्य शताब्दि-कमिट्यांनीं, केंद्रीय व राज्य-गांधी-स्मारक-निधींनी आणि कैक विधायक संस्थांनीं व कार्यकर्त्यांनी हातांत घेतलीं आहेत.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे गांधीजी आणि त्यांचें कार्य व शिकवण यासंबंधीं पुस्तकें प्रसिद्ध करणें. चालू पिढीतील तरुण मुलांनीं गांधीजींना पाहिलेलें नाहीं, एवढेंच नव्हे तर, भारतीय जनतेवर, किंबहुना, भारताबाहेरील जनतेवरहि त्यांचा किती विलक्षण प्रभाव व अधिकार चालत असे, हेंहि त्यांना माहीत नाहीं. म्हणून, त्यांच्या जीवनाची व कार्याची ओझरती दर्शनें देणारें एखादें सचित्र पुस्तक तयार करणें अवश्य आहे, असें आम्हाला वाटले.

असें पुस्तक लिहिण्याची आपली तयारी असल्याचें श्रीमती सरलाबेन मुजुमदार व श्रीमती कुरंगीबेन देसाई यांनीं कळविलें. याबद्दल मुंबई-गांधी-स्मारक निधि त्यांचा ऋणी आहे. मुलांच्या मनांत योग्य तत्त्वांची पेरणी व्हावी या हेतूनें श्रीमती सरलाबेन यांनीं सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, निर्भयता इत्यादि गांधीजींच्या जीवनांतील गुण प्रगट करणारे प्रसंग निवडले. ते प्रसंग चित्रित करण्यासाठीं त्यांनीं स्वतः चित्रेंही काढली आणि थोड्या शब्दांत प्रत्येक चित्राचा भाव लिहून दिला. त्यामुळें गांधीजींच्या जीवनाची व कार्याची प्रमुख अंगे सहजगत्या व्यक्त झाली.

या पुस्तकाचें इंग्रजी रुपांतर करण्याचे कामीं श्रीमती सरलाबेन व श्रीमती कुरंगीबेन यांना श्री. हेमंतकुमार देसाई यांचे साहाय्य झाले. श्रीमती कुरंगीबेन देसाई आणि श्रीमती चित्रा देसाई यांनीं, श्री. मधुसूदन वैद्य, श्री. शिवशंकर वशिष्ठ व श्री. प्रणव ओंकार देसाई यांच्या साहाय्याने, या पुस्तकाचे हिंदीत भाषांतर केले.

मुंबई हे एक बहुभाषिक शहर आहे म्हणून —आणि हें पुस्तक अन्य राज्यांतहि उपयुक्त ठरावे म्हणून — भारतांतील गांधी-स्मारक-निधीच्या राज्य-मंडळाशीं संपर्क साधण्यांत आला. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, केरळ व तामिळनाड या राज्यांतून या पुस्तकासाठीं मागण्या आलेल्या आहेत.

तामिळ भाषांतरासाठीं आम्हीं तामिळनाड गांधी-स्मारक-निधीचे संचालक व कट्टे गांधीवादी कार्यकर्ते श्री. के. अरुणाचलम् यांना विनंती केली. तामिळ सर्वोदय मंडळाचे श्री. नटराजन यांच्याकडून ते भाषांतर तयार करवून घेऊन श्री. के. अरुणाचलम् यांनीं आम्हांस उपकृत केलें आहे.

तसेच, केरळ गांधी-स्मारक-निधीचे श्री. जनार्दन पिल्ले यांनीं मल्याळी भाषांतर आणि श्री. नारायणराव कोडाटी यांनीं तेलगू भाषांतर करवून घेतलें. गांधी-वाङ्मयाचे स्वतः एक लेखक असलेले व महाराष्ट्र गांधी-स्मारक-निधीचे संचालक श्री. दा. न. शिखरे यांनीं या पुस्तकाचें मराठी भाषांतर केले.

म. गांधींचे एक सहकारी आणि प्रख्यात ग्रंथकार व शिक्षण-तज्ञ आचार्य काकासाहेब कालेलकर यांनीं या पुस्तकाला प्रस्तावना लिहून त्याला आगळे महत्व मिळवून दिलें, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

हे पुस्तक तयार करण्याचे व भाषांतरित करण्याचे कामीं तसेच त्याचीं मुद्रितें तपासण्याचे कामींहि अमूल्य मदत करणाऱ्या या सर्व गांधीवादी बंधु-भगिनींचे आम्हीं अत्यंत कृतज्ञ आहोंत.

हें पुस्तक छापण्याचें काम 'बॉम्बे फाइन् आर्ट ऑफसेट अँड लिथो वर्क्स मुंबई' यांनीं पत्करलें आणि आमच्या पूर्ण पसंतीला उतरेल, अशा रीतीनें विविध भाषांत छपाई करण्याचें काम चिकाटीनें तडीस नेलें, याबद्दल आम्हीं त्यांना धन्यवाद देतों.

श्रीमती सरलाबेन मुजुमदार यांनी केवळ हें पुस्तक रचलें आणि चित्रांनीं सजविलें असें नव्हे तर, या प्रारंभीच्या कष्टप्रद कामाशिवाय, त्यांनीं छापखान्यांत सतत जाऊन मुद्रणाच्या बारीक सारीक गोष्टींकडेही लक्ष पुरविले, याचा उल्लेख आम्हीं न केला तर आम्हीं कृतघ्न ठरूं. सध्याच्या काळीं फारच थोडे लोक गांधीजींची तत्वें आपल्या आचरणांत आणीत आहेत. अशा वेळीं देशांतील मुलांच्या सेवेसाठीं प्रेमानें परिश्रम करणारे श्रीमती सरलाबेनसारखे लोक आहेत, हें पाहून आम्हास आनंद वाटतो.

ही आपली भूमिका विशद करून, मुंबई गांधी-स्मारक-निधि हे छोटेखानी सचित्र पुस्तक प्रिय बालकांना सादर करीत आहे. त्यांना तें आवडेल आणि बापूजींविषयीं व त्यांच्या कार्याविषयीं व तत्वज्ञानाविषयीं अधिक वाचण्याची भूक त्यांच्या मनांत निर्माण होईल, अशी आशा वाटते.

—मुंबई गांधी स्मारक निधि

IRBK-0112572

प्रकाशक

मि. पे. झांओवाला,

मंत्री, मुंबओ गांधी स्मारक निधी

मणीभवन, १९, लेबरनम रोड,

गांवदेवी, मुंबओ ७.

प्रथम आवृत्ति

१९६८

किंमत रु. २

मुद्रक

बॉंबे फाओन आर्ट ऑफसेट ॲन्ड लिथो वर्क्स,

मुंबओ २७.

# [प्रका]शकाची भूमिका

म. गांधींची जन्म-शताब्दि ता. २ ऑक्टोबर १९६९ रोजी आहे. ही शताब्दि योग्य तऱ्हेनें कशी साजरी करावी, हा प्रश्न भारतांतील सर्व कार्यकर्त्यापुढें आणि मध्यवर्ती व राज्य सरकारापुढें, १९६४ सालापासून उभा आहे. गांधीजींचा जन्मदिन, त्यांच्याच सूचनेनुसार, "चरखा-जयंति" म्हणून नेहमीं साजरा केला जातो. त्याचप्रमाणे, या शंभराव्या जयंतीचे कार्यक्रम म्हणून निरनिराळीं राष्ट्र-संवर्धक, विधायक कार्यें राष्ट्रीय व राज्य शताब्दि-कमिट्यांनीं, केंद्रीय व राज्य-गांधी-स्मारक-निधींनी आणि कैक विधायक संस्थांनीं व कार्यकर्त्यांनी हातांत घेतलीं आहेत.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे गांधीजी आणि त्यांचें कार्य व शिकवण यासंबंधीं पुस्तकें प्रसिद्ध करणें. चालू पिढीतील तरुण मुलांनीं गांधीजींना पाहिलेलें नाहीं, एवढेंच नव्हे तर, भारतीय जनतेवर, किंबहुना, भारताबाहेरील जनतेवरहि त्यांचा किती विलक्षण प्रभाव व अधिकार चालत असे, हेंहि त्यांना माहीत नाहीं. म्हणून, त्यांच्या जीवनाची व कार्याची ओझरती दर्शनें देणारें एखादें सचित्र पुस्तक तयार करणें अवश्य आहे, असें आम्हाला वाटले.

असें पुस्तक लिहिण्याची आपली तयारी असल्याचें श्रीमती सरलाबेन मुजुमदार व श्रीमती कुरंगीबेन देसाई यांनीं कळविलें. याबद्दल मुंबई-गांधी-स्मारक निधि त्यांचा ऋणी आहे. मुलांच्या मनांत योग्य तत्त्वांची पेरणी व्हावी या हेतूनें श्रीमती सरलाबेन यांनीं सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, निर्भयता इत्यादि गांधीजींच्या जीवनांतील गुण प्रगट करणारे प्रसंग निवडले. ते प्रसंग चित्रित करण्यासाठीं त्यांनीं स्वतः चित्रेंही काढली आणि थोड्या शब्दांत प्रत्येक चित्राचा भाव लिहून दिला. त्यामुळें गांधीजींच्या जीवनाचीं व कार्याचीं प्रमुख अंगे सहजगत्या व्यक्त झाली.

या पुस्तकाचें इंग्रजी रुपांतर करण्याचे कामीं श्रीमती सरलाबेन व श्रीमती कुरंगीबेन यांना श्री. हेमंतकुमार देसाई यांचे साहाय्य झालें. श्रीमती कुरंगीबेन देसाई आणि श्रीमती चित्रा देसाई यांनीं, श्री. मधुसूदन वैद्य, श्री. शिवशंकर वशिष्ठ व श्री. प्रणव ओंकार देसाई यांच्या साहाय्यानें, या पुस्तकाचें हिंदीत भाषांतर केलें.

मुंबई हे एक बहुभाषिक शहर आहे म्हणून — आणि हें पुस्तक अन्य राज्यांतहि उपयुक्त ठरावें म्हणून — भारतांतील गांधी-स्मारक-निधीच्या राज्य-मंडळाशीं संपर्क साधण्यांत आला. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, केरळ व तामिळनाड या राज्यांतून या पुस्तकासाठीं मागण्या आलेल्या आहेत.

तामिळ भाषांतरासाठीं आम्हीं तामिळनाड गांधी-स्मारक-निधीचे संचालक व कट्टे गांधीवादी कार्यकर्ते श्री. के. अरुणाचलम् यांना विनंती केली. तामिळ सर्वोदय मंडळाचे श्री. नटराजन यांच्याकडून ते भाषांतर तयार करवून घेऊन श्री. के. अरुणाचलम् यांनीं आम्हांस उपकृत केलें आहे.

तसेच, केरळ गांधी-स्मारक-निधीचे श्री. जनार्दन पिल्ले यांनीं मल्याळी भाषांतर आणि श्री. नारायणराव कोडाटी यांनीं तेलगू भाषांतर करवून घेतलें. गांधी-वाङ्मयाचे स्वतः एक लेखक असलेले व महाराष्ट्र गांधी-स्मारक-निधीचे संचालक श्री. दा. न. शिखरे यांनीं या पुस्तकाचें मराठी भाषांतर केलें.

म. गांधींचे एक सहकारी आणि प्रख्यात ग्रंथकार व शिक्षण-तज्ज्ञ आचार्य काकासाहेब कालेलकर यांनीं या पुस्तकाला प्रस्तावना लिहून त्याला आगळे महत्व मिळवून दिलें, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

हे पुस्तक तयार करण्याचे व भाषांतरित करण्याचे कामीं तसेच त्याचीं मुद्रितें तपासण्याचे कामींहि अमूल्य मदत करणाऱ्या या सर्व गांधीवादी बंधु-भगिनींचे आम्हीं अत्यंत कृतज्ञ आहोंत.

हें पुस्तक छापण्याचें काम 'बॉंबे फाइन् आर्ट ऑफसेट अँड लिथो वर्क्स मुंबई' यांनीं पत्करलें आणि आमच्या पूर्ण पसंतीला उतरेल, अशा रीतीनें विविध भाषांत छपाई करण्याचें काम चिकाटीनें तडीस नेलें, याबद्दल आम्हीं त्यांना धन्यवाद देतों.

श्रीमती सरलाबेन मुजुमदार यांनी केवळ हें पुस्तक रचलें आणि चित्रांनीं सजविलें असें नव्हे तर, या प्रारंभीच्या कष्टप्रद कामाशिवाय, त्यांनीं छापखान्यांत सतत जाऊन मुद्रणाच्या बारीक सारीक गोष्टींकडेही लक्ष पुरविलें, याचा उल्लेख आम्हीं न केला तर आम्हीं कृतघ्न ठरूं. सध्याच्या काळीं फारच थोडे लोक गांधीजींची तत्वें आपल्या आचरणांत आणीत आहेत. अशा वेळीं देशांतील मुलांच्या सेवेसाठीं प्रेमानें परिश्रम करणारे श्रीमती सरलाबेनसारखे लोक आहेत, हें पाहून आम्हास आनंद वाटतो.

ही आपली भूमिका विशद करून, मुंबई गांधी-स्मारक-निधि हे छोटेखानी सचित्र पुस्तक प्रिय बालकांना सादर करीत आहे. त्यांना तें आवडेल आणि बापूजींविषयीं व त्यांच्या कार्याविषयीं व तत्वज्ञानाविषयीं अधिक वाचण्याची भूक त्यांच्या मनांत निर्माण होईल, अशी आशा वाटते.

**— मुंबई गांधी स्मारक निधि**

IRBK-0112572



मुलांत मूल

# प्रस्तावना

**"मुलांचे गांधी"** या पुस्तकांत चित्रें आहेत आणि गोष्टी पण आहेत. ती चित्रें व त्या गोष्टी—एकामागामोग एक—मी वारकाईने पाहिली आहेत. चित्रांमध्ये जे प्रसंग रंगविलेले आहेत, त्यांच्यावर प्रकाश पाडण्यासाठींच गोष्टी लिहिलेल्या आहेत. ती चित्रें समजण्यासाठीं जे वातावरण असणें अवश्य आहे, ते निर्माण करण्याचे कार्य या गोष्टी करीत आहेत. तथापि, रंगाने व कुंचल्याने व्यक्त होणारे कलावंताचे व्यक्तिमत्व शब्दांतूनहि प्रकट झाल्याशिवाय राहात नाहीं. याचे एकच उदाहरण मी देतो.

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत गांधीजी सर्व देशभर दौरे काढात असत आणि देशाला कार्य करण्यास उत्साहित करीत असत. अशा एका प्रसंगी, त्या स्वातंत्र्य-लढ्यांतील अग्रभागी असलेल्या शहरांत—मुंबापुरींत-एका प्रचंड सभेंत भाषण करण्यासाठीं गांधीजी अत्यंत उच्च अशा व्यासपीठावर उभे होते. तेथून त्यांनीं ब्रिटिश सरकारला सूचना दिली, "चले जाव!"

जगांतील सर्वांत मोठ्या साम्राज्याच्या सामर्थ्याला आव्हान देणारी बापूजींची ती कृश मूर्ति! त्या प्रसंगाचे चित्र लाखो भारतीयांनी आपल्या हृदयांत साठविलेले आहे. ते अविस्मरणीय दृश्य सरलाबेन यांनी आपल्या चित्रांत समर्थपणें रंगविले आहे, एवढेच नव्हे तर एका अर्थपूर्ण वाक्यांत ते स्पष्टपणें व्यक्त केले आहे. ते वाक्य म्हणजे "उच्च व्यासपीठावर उभे राहिलेले गांधीजी, दीपस्तंभाची आठवण करून देत होते."

या आकर्षक पुस्तकाचे प्रमुख अंग म्हणजे अर्थात्च त्यांतील २५ चित्रें. ती पाहून मी अक्षरशः मुग्ध झालो. इतकी मोहिनी माझ्या मनावर कां पडली, हे सांगण्यासाठीं चित्रकलेविषयींचे माझे मत मी येथे मांडतो.

ही कला म्हणजे फोटोग्राफीची वायफळ नक्कल मुळीच नाहीं. मी दुसरीकडे म्हटले आहे कीं, कॅमेरा हे एक आंधळे यंत्र आहे. कारण, काय घ्यावे व काय टाकावे, ही सारासार-दृष्टी त्याचेजवळ असत नाहीं. आपल्या परिघांत जे-जे येईल, ते-ते तो नोंदतो. जे-जे आपल्याला दिसेल, तेवढेच नोंदणें, एवढेच त्या अंध यंत्राला माहीत असते. चित्रकाराचा उद्देश अगदी निराळा असतो. चित्रमय दर्शनांत मध्यवर्ती व्यक्ति. विशिष्ट प्रसंग आणि त्या प्रसंगाचे स्थान—याहून अधिक कशाचे स्पष्ट दर्शन होण्याची गरज नसते. जड वा चेतन अशी कोणतीहि वस्तू कलाकाराच्या दृष्टीस पडली म्हणजे, त्या वस्तूचे सार—हृदयच—पकडण्याचे कार्य त्याची दृष्टी करीत असते. आणि आपल्या मनावर जो अदृश्य ठसा उमटलेला असतो, तो रेषांनी व रंगांनी तो मूर्तपणें उभा करतो!

गांधीजींच्या एखाद्या विशिष्ट चित्रांत त्यांची मूर्ति सहज ओळखू आली म्हणजे पुरे. गांधीजींचा स्वभाव, त्यांचे थोर चारित्र्य, त्यांना वाटणारा मुलांचा लळा, एखादे संकट आ वासून उभे राहिले असताना त्यांनी दाखविलेली अचल दृढता, ईश्वर-भक्तीचे त्यांचे शुद्ध अंतःकरण आणि कार्य-परायण माणसाला अवश्य असणारी निर्णय-शक्ति—हे सारे गांधीजींच्या फोटोमध्ये कधीच प्रकट होणार नाहीं—कॅमेरा ते पकडूच शकणार नाहीं. पण कलाकार ते सारे मनश्चक्षूपुढे आणून आपल्या गांधीजींच्या चित्रांत ते सर्व आणण्याचा प्रयत्न करतो. फोटोग्राफी ही केवळ नोंदणारी यांत्रिक कला आहे, तर चित्रकला ही सर्जनशील आहे. मी चित्रें पाहतो, ती या दृष्टीकोनांतून. एक कृष्ण-हृदयी गोरा गाडीवान गांधीजींना बडवीत आहे, हे दाखविणाऱ्या चित्रांतील गाडी मूळच्या गाडीसारखीच असली पाहिजे—तरच त्या चित्राचे गुणग्रहण करता येईल—असे मला वाटत नाहीं.

जगाच्या कोनाकोपऱ्यांतून आलेल्या असंख्य कलाकारांनी गांधीजींची चित्रें काढण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यांतील कांहीं इतकी चांगली आहेत कीं, त्यांचे आश्चर्य वाटते. पण ज्यांना सर्जनशील दृष्टी नाहीं, असे कलावंत अपयश पावले आहेत. आपली राहणी, आपली संस्कृती, आपली राष्ट्रीय प्रकृती व आकांक्षा—यांचा परिचय नसल्यामुळे विदेशी कलाकारांना, गांधीजींच्या जीवनाचा आशय चित्रित करण्याचे कामी, अनेक विघ्नांना तोंड द्यावे लागते तरीहि कांहीं विदेशी चित्रकारांनी गांधीजींच्या अंतःकरणाशी आपल्या अंतःकरणांची तार जमविण्यात यश मिळविले आहे. म्हणून, त्यांच्या चित्रांतील तपशीलामध्ये कांहीं विसंगती आढळल्यास, आपण त्याकडे कानाडोळा करतो खरोखर, तशा गौण गोष्टीकडे आपले लक्ष मुळीच वेधले जात नाहीं.

या पुस्तकांतील चित्रांवरून हे दिसून येते कीं, सरलाबेन या कोरीव—कातीव कलाकार नाहींत. अगदी लहानपणापासून त्यांच्या चित्तांत गांधी-तत्व मुरलेले आहे आणि गांधीजींच्या कार्यांत त्यांनी बराच काळ भाग घेतलेला आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीशी व आपल्या ध्येयवादाशी विसंगत किंवा बेसूर असें या चित्रांत कांहीहि नाहीं, एवढेच नव्हे तर, त्यांनी जे प्रसंग चित्रित केले आहेत, त्यांचा अगदी गाभा प्रकट करण्यांत त्यांनी अलौकिक यश संपादिले आहे.

ध्येय-प्राप्तीसाठीं जितके अधिक प्रयत्न करावे, तितके ते ध्येय अधिक पवित्र व मौल्यवान बनते, हे सर्वांना माहीत आहे. जर सरलाबेन यांनी आपल्या अगदी लहानपणापासून गांधीजींच्या कार्यांत भाग घेतला असता, तर त्यांना ती कार्ये, आतांइतकी, पावन, मौल्यवान, लाभदायक व महत्त्वाची कदाचित वाटली नसती. त्यांच्या घरची स्थिती विरोधी नसली तरी त्यांना फारशी उपकारक नव्हती. त्यांचे वडील ब्रिटिश राजवटींत सरकारी नोकर होते, पण अंतःकरणाच्या अदम्य प्रेरणेमुळे त्या गांधीजींच्या कार्याकडे वळल्या. अंतःकरणांतील ती प्रदीप्त भावना लपून कशी राहील? आपल्याला पूज्य व पवित्र असणाऱ्या वस्तूचे चित्रण करण्यासाठीं त्यांनी जेव्हां आपल्या हाती कुंचला घेतला, तेव्हां ती भावना उफाळून आली.

आतां गांधी-जन्म-शताब्दि जवळ आली आहे. केवळ भारतातीलच नव्हे, तर सर्व जगतांतील सामर्थ्यशाली मनें व गांधीजींच्या ध्येयवादाने प्रकाशित झालेली अंतःकरणें, आपापल्या स्वभावानुसार आपली श्रद्धा व प्रेम व्यक्त करतील. हे जग जितके विविध आहे, तितक्या विविधतेने गांधीजींचे दर्शन आपल्याला घेता येईल आणि आनंद लुटता येईल. त्या विविध दर्शनामध्ये या चित्र-संग्रहाला, त्याच्या विशिष्ट गुणवत्तेमुळे, आदराचे स्थान प्राप्त होईल, यात शंका नाहीं.

—आचार्य काका कालेलकर

अनुक्र. ५६६०९ ... वि. बा वा.
३६५८ नोंद दि. ३०।३।०९


# अर्पण

कुठें माहात्म्य बापूंचें कुठें हा यत्न अल्पधी
फळ शाखेवरी उंच्र कर मी लांबवी वृथा
भक्ति-आदर प्रेरी हा कुंचला शोधुं ना शके
कला सार्थक होते या लोभानें मन आवरीं

घेतें जेव्हां गहन जाळें या मी बुडी जीवनाच्या
रत्नें नाना अति नवनवीं पाहुनी धन्य होतें
वेचीं थोड्या पुनित कणिका रत्नराशीमधून
गुंफीं माला प्रियस्वजनशा बालकांनो तुम्हा ही

तेजस्वी रत्नमाला ही सदैव उरिं वागवा
प्रभा नित्य तिची विश्वीं पसरेल असे करा.

सरलादेवी



मोहनच्या मनाला आकार देणारे स्वप्न

# सत्याचा सूर्योदय.

हा मुलगा शांतपणें झोपला आहे काय? त्याला गाढ झोप लागली आहे काय? छे:! तो स्वप्नें पाहात आहे.


हे स्वप्न कोणते? राजा हरिश्चंद्राचे हे स्वप्न आहे. राणी तारामतीच्या मांडीवर सर्पदंश झालेला पुत्र रोहिदास मरून पडलेला आहे. जवळच हरिश्चंद्र उभा आहे. हे सारे दृश्य तरुण मोहन स्वप्नांत ढळढळीतपणें पाहात आहे. कारण त्या दिवशीं संध्याकाळी, त्याने हरिश्चंद्राचे एक नाटक पाहिले होते. त्याचा त्याच्या मनावर विलक्षण पगडा बसला होता.

राजा हरिश्चंद्र आणि राणी तारामती यांची कथा तुम्हाला खचित माहित असेल. केवळ सत्यासाठीं हरिश्चंद्रानें साऱ्या राजवैभवाचा त्याग केला आणि एका डोंबाचे घरी तो नोकर म्हणून राहिला. केवळ सत्यासाठीच तारामतीनें गरीबीचे सारे हाल भोगले—ते इतके कीं, आपला प्रिय पुत्र जेव्हां सर्पदंशानें मृत्यु पावला, तेव्हां त्याच्या अंत्यविधीसाठींही तिच्याजवळ पैसा नव्हता.

असें ते नाटक पाहून मोहन घरीं परत आला, तेव्हां त्याच्या डोक्यांत त्या नाटकांतील विचारच भरलेले होते. नाटकांतील प्रसंग त्याच्या मनापुढें एकसारखे नाचूं लागले—मग तो झोपेंत असो जागा असो, एकटा असो किंवा मित्रांच्या संगतीत असो. हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास यांच्या दुःखांचें आणि क्लेशांचें स्मरण होताच मोहनच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वहात. "सत्यासाठीं मीसुद्धां कोणतेही क्लेश सोशीन" असा निश्चय त्यानें केला.

या मुलाचें संपूर्ण नांव मोहनदास करमचंद गांधी. त्याचा जन्म ता. २ ऑक्टोबर १८६९ रोजीं पोरबंदर येथें झाला. पोरबंदर हें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर एक लहानसें बंदर आहे. तें सौराष्ट्रांत आहे.

अशा प्रकारें, अगदीं लहानपणापासून, मोहनदास गांधींच्या अंतःकरणांत सत्याचें प्रेम उदय पावलें. त्या सत्याच्या प्रकाशानें त्याच्या सर्व आयुष्याचे मार्ग उजळून निघाले. त्यांनीं सत्य कधींच सोडलें नाही. त्यांचे वय जसे वाढत गेले, तसे ते सत्याला ईश्वर मानू लागले. मोठेपणीं त्यांना "महात्मा" म्हणूं लागले. कारण, त्यांची सत्यनिष्ठा अढळ होती आणि त्यामुळे त्यांच्या अंगी पुष्कळ सद्‌गुण आले.



रामनाम — भींतीवर तोडगा

# रामनामाचे बीज

मोहनचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर संस्थानचे दिवाण होते. मोहनच्या आईचे नांव पुतळीबाई. त्या एक अत्यंत साधी, प्रेमळ व पवित्र स्त्री होत्या. त्यांनी पुष्कळ धार्मिक व्रतें घेतली होती आणि त्यांचे पालन त्या निष्ठेने व भक्तिने करीत असत. याचा परिणाम बाल मोहनच्या मनावर फार खोलवर झाला.

पोरबंदर येथे गांधीजी ज्या घरांत राहत होते, ते मोठे होते. लहानपणी मोहन फार भित्रा होता. अंधारात जाण्याला त्याला भीति वाटे. दाराआड चोर लपले आहेत आणि कोपऱ्याकोपऱ्यांत भुतें उभीं आहेत, अशी भीति त्याच्या मनात अंधारामुळें उत्पन्न होई.

त्या कुटुंबात रंभा नावाची एक मोलकरीण होती. तिचे मोहनवर फार प्रेम असे. तिला वाटे, मोहनने भीति सोडली पाहिजे. ती त्याला प्रेमाने व हळुवारपणानें पुष्कळ गोष्टी सांगे. ती मोहनला म्हणे, "जेव्हां तू अंधारात जाशील, तेव्हां रामाचे नांव घे, म्हणजे तुला कोणाचे भय बाळगण्याचे कारण नाहीं." ती इतक्या दृढ श्रद्धेनें हे सांगे कीं, तिच्या बोलण्याचा मोहनच्या मनावर विलक्षण परिणाम होई. त्यामुळे तो जेव्हां जेव्हां काळोखात जाई, तेव्हां तो रामनाम घेई. अशा प्रकारे त्याने हळुहळु भीतीवर मात केली. राम आपल्या पाठीशी उभा आहे आणि आपले रक्षण करीत आहे, असे त्याला वाटूं लागले.

राम-नाम जपण्याची सवय मोहनला लागली. आपल्या सर्व संकटांचे वेळी आपल्याला धीर देणारा अचूक आधार म्हणजे राम-नाम हाच आहे, अशी त्याची खात्री पटली. बाल मोहनच्या अंतःकरणात रंभेने हे जे बीज रोवले, ते कालांतरानें वाढत गेले आणि त्यातूनच ईश्वरावरील गाढ श्रद्धेचा विशाल वृक्ष वाढला.



एकाग्रतेने ऐकताना

# राम-नामावर जल-सिंचन

आपण बी पेरतो आणि त्याला पाणी घालतो, मग त्याला अंकुर फुटतो व त्याचा महान् वृक्ष होतो. याच रीतीने, बाल मोहनच्या अंतःकरणात रुजलेले राम-नामाचे बीज भक्तीच्या जल-सिंचनाने वाढूं लागले.

एकदां असें घडले कीं, पोरबंदर येथें रामाच्या देवळांत एक मोठे राम-भक्त आले आणि कांही महिने तेथे राहिले. त्यांचे नांव लाधामहाराज.

दररोज संध्याकाळी, त्या देवळाच्या परिसरांत, लाधामहाराज रामायणातील राम-कथा सांगत असत. ते सांगण्याचा त्यांचा स्वर इतका मधुर असे आणि त्यांची पद्धत इतकी आकर्षक असे कीं, सारा श्रोतृ-समाज मंत्र-मुग्ध होऊन जाई.

त्यावेळी मोहनचे वय तेरा वर्षांचे होते. रामायणातील कथा ऐकण्यासाठीं तो आपल्या मित्रांसह त्या देवळात जाई. त्या कथा ऐकतांना त्याचे देह-भान हरपे. तो त्या कथा एकतानतेने श्रवण करी. आपल्या ओठावर आपले हात ठेवून किती आस्थेने व एकाग्रतेने तो त्या कथा ऐकत आहे, पहा! लाधा-महाराजांच्या कथामुळें मोहनची राम-भक्ती वाढीस लागली.

राम-नामाचा जप करणें हा मोहनचा कायमचा छंद बनला—तो त्याचा जन्म आमरण अखंड टिकला.

मोहनचे वर्णन करतांना एक कवि म्हणतो—

देहांतिल कणकण रामनामें नाचे।



निष्पाप बालकांची नजर

# सत्यनिष्ठ विद्यार्थी

मोहनच्या वडिलांनी पोरबंदरची दिवाणगिरी सोडली आणि राजकोट संस्थानचे दिवाण ते झाले. म्हणून त्यांचे कुटुंब राजकोट शहरात रहावयास गेले. तेथे मोहनला एका इंग्रजी शाळेत शिकावयास घातले.

एके दिवशीं शाळांचे तपासनीस ती शाळा पहाण्यास आले. त्यांनी त्या वर्गाला पांच इंग्रजी शब्द लिहावयास सांगितले.

मुलांनी नक्कल करु नये म्हणून शिक्षक वर्गातून हिंडत होते. मोहनने एक शब्द चुकीने लिहिल्याचे त्यांच्या ध्यानी आले. आपल्याजवळ बसलेल्या मुलाच्या पाटीवरून स्पेलिंग पाहून बरोबर लिहिण्यास त्यांनी मोहनला खूण केली. साध्याभोळ्या मोहनच्या लक्षांत ते आले नाहीं. मुलांना नक्कल करू न देणे हे ज्यांचे कर्तव्य, तेच शिक्षक आपल्याला नक्कल करण्यास सांगत असतील, असे त्याला कसे वाटावे? तो शिक्षकाकडे अजाणपणे पाहू लागला.

शिक्षक फिरत फिरत पुनः मोहनजवळ आले. आपली खूण याला कळली नाही, हे त्यांच्या ध्यानी आले. म्हणून त्यांनी आपल्या बुटाच्या टोकाने त्याला किंचित् ढकलले, पण व्यर्थ. साऱ्या विद्यार्थ्यांनी त्या पांचही शब्दांचे स्पेलिंग बरोबर लिहिले, पण मोहनने एक चूक केली. तो साऱ्या शाळेंत ढ ठरला.

तपासनीस निघून गेल्यानंतर शिक्षकांनी मोहनला खडसावून विचारले, 'तूं माझी आज्ञा का मोडलीस?' तेव्हां कोठे मोहनच्या ध्यानी आले कीं, शिक्षक आपल्याला लबाडी करण्यास सांगत होते. पण त्यांच्या टोमण्याने किंवा "तूं मठ्ठ आहेस" म्हणून त्यांनी केलेल्या अपमानाने, मोहनला दुःख वाटले नाहीं. आपल्या सरळपणामुळे लबाडीपासून आपण वाचलो, याचाच त्याला आनंद वाटला.



आईसाठीं केलेल्या प्रतिज्ञा

# तीन पवित्र प्रतिज्ञा

हे चित्र पहा. कॉलेजांत जाणारा तरुण मोहन उजव्या बाजूस आहे. त्याला ओळखणें कठीण आहे. नाहीं? त्याची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. जवळच्या भावनगर शहरांतील कॉलेजांत तो शिकत आहे. त्याला इंग्लंडला पाठविण्याची तयारीहि चालू आहे.

गांधी-कुटुंबाच्या एका वयोवृद्ध हितचिंतकानें अशी सूचना केली कीं, आपल्या कुटुंबाची उच्च प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठीं. उच्च शिक्षण घेण्याकरितां, मोहनला इंग्लडला पाठवावें. मोहनच्या वडील भावाने याला संमति दिली आणि त्याच्या चुलत्याने पण. त्याची आई पुतळीबाई हिला अशी भीति वाटत होती की, इंग्लडला गेल्याने मोहन मांसाहार व मद्यपान करु लागेल व त्याला कुसंगति जडेल. आपला चांगला मुलगा मोहन तेथे बिघडेल. अशी चिंता तिला वाटू लागली. तेव्हां तिनें आपल्या कुटुंबाचे एक मित्र असलेले जैन संन्याशी यांना विचारलें. संन्याश्यानें सांगितलें. "मुलाला तीन प्रतिज्ञा करावयास सांगा." पुतळीबाईना ती कल्पना पसंत पडली.

मोहनला जैन-मंदिरांत बोलावण्यांत आले. आपली माता व संन्याशी यांच्यासमक्ष मोहननें पुढील तीन व्रतें घेतली—मद्यपान न करणे. मांसाहार व मत्स्याहार न करणें आणि कुसंगति टाळणें.

गंभीरपणें घेतलेली ही सारी व्रतें मोहन पाळील अशी खात्री पुतळीबाईना वाटत होती. मोहननें त्यांचें पालन निष्ठेनें केलें. इंग्लंडला जाताना प्रवासांत मोहनपुढे मोहाचे प्रसंग आले. मद्य-मांसाविना इंग्लंडच्या थंड हवेंत जीवंत रहाणें अशक्य आहे, असें एका इंग्रजानें त्याला सांगितलें. मोहननें उत्तर दिलें. "तसे झाले तर मी परत येईन. पण मी आईला दिलेले वचन कधीहि मोडणार नाहीं."

लंडनमध्ये शाकाहारी भोजन देणारे हॉटेल मोहनला प्रथम सापडलें नाहीं. म्हणून आपल्याबरोबर आणलेले कांहीं खाद्य पदार्थ, पाव व बिस्किटें यांच्यावर गुजारा करुन तो अर्धवट उपाशी राहू लागला. पण सत्याने चालणाऱ्या माणसाचा वाली परमेश्वर असतो. बारकाईने शोध केल्यावर, एके दिवशी मोहनला "शाकाहारी हॉटेल" अशी पाटी दिसली. त्यादिवशी त्याला पोटभर जेवण मिळाले.

नंतर तो इंग्लडच्या शाकाहारी संस्थेचा नियमित सभासद झाला आणि त्या संस्थेच्या कार्यात त्याने पुष्कळ भाग घेतला.



अहिंमक प्रतिकार

# मोहनचा पहिला सत्याग्रह

आतां मोहन हा "इंग्लंडहून आलेला" सन्माननीय बॅरिस्टर श्री. मोहनदास करमचंद गांधी झाला होता. एका बड्या हिंदी व्यापाऱ्यानें, आपल्या एका किचकट खटल्याबाबत, मोहनदासांना लवकरच दक्षिण आफ्रिकेंत मदतनीस बॅरिस्टर म्हणून बोलविलें.

त्या देशांत पाऊल टाकता क्षणीच मोहनदासांना धक्का बसला. कारण, तेथील गोरे लोक वर्णीय लोकांना अत्यंत वाईट रीतीनें वागवीत असत. खुद्द मोहनदासांचा अपमान कैक वेळा झाला. एकदां रेल्वेचें तिकीट घेऊन ते पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसले, पण तेथून त्यांना ओढून काढण्यांत आलें. एकदां ते वकील म्हणून कोर्टांत गेले, पण न्यायाधीशानें त्यांना आपल्या डोक्यावरील हिंदी पागोटें काढावयास भाग पाडलें.

एकदां मोहनदासांना प्रिटोरियाला जाताना घोड्याच्या गाडींतून जावें लागलें. गाडीच्या आंत इतर गोरे उतारु बसले होते. त्यांच्या शेजारी मोहनदासांना जागा मिळाली नाहीं—गाडीवानाजवळच्या जागेवर बसावें लागलें. हा अपमान त्यांनी सहन केला. पण खरी कसोटी लवकरच लागली. गोऱ्या गाडीवानाला धूम्रपान करण्याची व गप्पागोष्टी करण्याची लहर आली. त्यानें मोहनदासांना पाय ठेवण्याच्या फळीवर बसण्यास सांगितलें. त्याला त्यांनी साफ नकार दिला. तेव्हां तो गोरा संतापला. त्यानें मोहनदासांवर लाखोली वाहिली. बुक्यांचा वर्षाव केला, फार काय, त्यांना ओढून काढण्याचाहि प्रयत्न केला. पण मोहनदास शांतपणें आणि सर्व-शक्तिनें त्या पेटीच्या गजांना, गोचिडाप्रमाणें, चिकटून राहिले.

या त्यांच्या मूक सत्याग्रहामुळे, आतील उतारु त्यांच्या मदतीस आले. ते त्या गोऱ्याला म्हणाले, "त्याला मारु नका. त्याचें म्हणणें बरोबर आहे. त्याला बाहेर बसू द्या किंवा आपल्याबरोबर गाडींत बसू द्या." शेवटी तो गोरा दुसऱ्या जागेवर जाऊन बसला. अशा प्रकारे मोहनदासांच्या पहिल्या सत्याग्रहाला ईश्वरानें यश दिलें.

असे अपमान सहन करणें हा शुद्ध भित्रेपणा आहे, अशी मोहनदासांची खात्री पटली. खटल्यासाठीं त्यांना तेथें फक्त एक वर्षच रहावयाचें होतें. पण आपल्या देशबांधवांचे गोऱ्या लोकांकडून जे अपमान व अन्याय होतात, त्यांना प्रतिकार करण्यासाठीं त्यांनी दक्षिण आफ्रिकेंत रहाण्याचें ठरविलें.



निर्भयता

# धैर्य व करुणा

दक्षिण आफ्रिकेंतील नाताळमध्यें फिनिक्सजवळ मोहनदासांनी एक आश्रम स्थापन केला. जवळच एक लहानसा झरा वाहात होता. आश्रमांतील कार्यकर्ते एका कुटुंबांत राहिल्याप्रमाणें साधेपणानें वागत आणि सद्गुण संपादण्याचा प्रयत्न करीत. ते मोहनदासांना "गांधीभाई" म्हणत. "गांधीजी" म्हणून ते पुढे ओळखले जाऊ लागले. असाच दुसरा एक आश्रम त्यांनी ट्रॅन्सवॉलमध्ये स्थापन केला.


या आश्रमांत हिंदु, मुसलमान, पारशी, इंग्रज, गुजराती, मद्रासी वगैरे लोक रहात. कांहीं वेळा त्यांची कुटुंबें त्यांच्याबरोबर असत. सत्यमय जीवन घालविण्याच्या गांधीजींच्या प्रयोगांत ते सहभागी होत. तेथे पुष्कळ वेळा साप निघत. पण आश्रमांतील नियमामुळे त्यांना कोणी मारीत नसे. माणसांप्रमाणें सापहि ईश्वराची निर्मिती आहे.

एकदां गांधीजी दूर गेले असतांना, रात्रीच्या वेळी आश्रमाच्या अंगणांत भयंकर फूत्कार ऐकू येऊ लागले. ८ फूट लांबीचा आणि खूप जाडजूड असा एक भयानक सर्प आश्रमवासियांकडे पहात राहिला. टोकाशी रेशमी जाळे असलेल्या लांब काठ्या लोकांनी आणल्या आणि त्या सापाला त्या जाळ्यांत पकडले. त्यातून तो पुनः पुनः उड्या मारी, जमिनीवर पडे. त्याला पकडणाऱ्या लोकांना अशी भीति पडली की, आतां हा साप निसटून जाईल. म्हणून त्यांनीं त्या जाळ्याच्या दोऱ्या जोराने ओढल्या. त्यावेळी गांधीजी तेथे आले. सापा-भोवतालचा घट्ट पाश पाहून त्यांचे अंतःकरण द्रवले. त्यांनी आश्रमवासियांना सांगितले. "सापाला खाली सोडा आणि जाळे सैल करा." तसे त्यांनी केले. पण त्यांना भीति वाटत होती कीं, खवळलेला साप मोकळा होईल आणि कोणाला तरी चावेल.

नंतर काय घडलें, याची कल्पना तुम्ही करु शकाल काय? तो प्रचंड सर्प शांतपणें पडून राहिला. त्याच्याजवळ गांधीजी बसले आणि त्याला थोपटू लागले. त्यामुळे तो सर्प अत्यंत संतुष्ट झाला—आणि आपला संतोष प्रदर्शित करण्यासाठीं आपली शेपटी हलवू लागला!

नंतर जवळच्या झऱ्याचे काठीं त्याला गुपचूप सोडण्यांत आले.

असे होते गांधीजींचे धैर्य—आणि इतर सर्व प्राण्यांबद्दल त्यांना वाटत होती अशी करुणा.



कस्तुरबांची प्रेमळ शुश्रूषा

# कस्तुरबांचा निश्चय–गांधीजींची सेवा

गांधीजींचा दक्षिण आफ्रिकेंतील मुक्काम वाढला, म्हणून त्यांच्या पत्नी कस्तुरबा आपल्या मुलासह तिकडे गेल्या. दोघेहि शाकाहाराचे व्रत कडकपणें पाळणारे होते. आपले प्राण वाचविण्यासाठीं मानवाने दुसऱ्याचे प्राण घ्यावे, ही कल्पनाच त्यांना सहन होत नसे. आजारीपणातहि शाकाहाराचे तत्त्व पाळावे असें त्यांना वाटे.

एकदां कस्तुरबा फार आजारी पडल्या. तेव्हां त्यांच्या एका इंग्रज डॉक्टर मित्राने त्यांना उपचारासाठीं आपल्या घरी नेले. मांसाचा रस दिल्याशिवाय कस्तुरबा जगणार नाहींत असे त्यांना वाटले, म्हणून त्यांनी गांधीजींना तसे कळविले.

ताबडतोब गांधीजी डॉक्टरच्या घरी गेले. त्यांनी कस्तुरबांना, जगण्यासाठी मांसाहार आवश्यक आहे, असा डॉक्टरचा अभिप्राय सांगितला. कस्तुरबा म्हणाल्या, "मी आनंदाने प्राण सोडीन पण धर्म सोडणार नाहीं." डॉक्टरला फार दुःख झाले. त्यानी गांधीजींना सांगितले, "मी माझ्या घरांत या कारणासाठीं रोग्याला मरू देणार नाहीं. तुम्ही कस्तुरबांना दुसरीकडे न्यावे."

बाहेर पाऊस पडत होता आणि स्टेशन दूर होते. "तेथे जाण्याचे मला भय वाटत नाहीं." असें कस्तुरबा म्हणाल्या. गांधीजींनी त्यांना रिक्शातून स्टेशनावर नेले आणि रेल्वेच्या डब्यापर्यंत आपल्या हातावरून नेले. कारण, तेथे आरामखुर्ची नव्हती. स्टेशनावरील लोक आपली चेष्टा करतील याची गांधीजीना कांहीं भीति वाटली नाहीं. ते दोघे फिनिक्सला सुखरूप पोचले.

फिनिक्स येथे गांधीजी कस्तुरबांचे डॉक्टर बनले–नर्स बनले–आश्रमांतील इतर कार्यकर्ते कस्तुरबांची सेवा करण्यास उत्सुक होते. पण, आपण स्वतः कस्तुरबांची शुश्रूषा करण्याचा आग्रह गांधीजींनी धरला.

एक आश्रमवासीय लिहितो, "न थकतां व धीर न सोडतां, गांधीजी कस्तुरबांची सेवा करू लागले–त्यांच्या अंथरुणाजवळ गांधीजी हातांत कांहीं पात्र घेऊन उभे आहेत, हे चित्र माझ्या डोळ्यांपुढे वारंवार येते."

आपल्या धर्माचे पालन करण्यासाठीं जीव धोक्यांत घालण्याचा जो निश्चय कस्तुरबांनी केला आणि गांधीजींनी त्यांची निष्ठेने जी सेवा केली, त्याला शेवटी फळ आले. कस्तुरबा पूर्णपणें बऱ्या झाल्या.



चित्ताला शांती देणारी प्रार्थना

# क्षमेमुळें घडलेला चमत्कार

ट्रान्सवाल सरकारनें एक वर्णविषयक कायदा मंजूर केला. त्यामुळे प्रत्येक हिंदी माणसाला तेथे राहाण्यासाठीं परवाना काढावा लागे. हा अन्याय्य कायदा हिंदी समाजाने धाब्यावर बसविला. हिंदी सत्याग्रह्यांनी तुरुंग भरून गेले.

शेवटी सरकारने गांधीजींना समेटासाठीं बोलाविले. त्यांनी हे कबूल केले कीं, हा सक्तीचा कायदा रद्द झाला तर, हिंदी लोक खुषीनें परवाने घेतील. त्यामुळें कांहीं पठाणांना असा संशय आला कीं, गांधीजींनी लाच खाल्ली असावी. म्हणून ते पठाण संतप्त झाले. त्यांच्यापैकी एक, मीर आलम, याने असें जाहीर केले कीं, "जो कोणी परवाना घेईल, त्याला मी ठार मारीन." त्याला गांधीजींनी समेटाची कारणें समजावून सांगितली आणि म्हटले, "परवाना-कचेरीकडे मी प्रथम जाईन."

ठरलेल्या दिवशी गांधीजी तिकडे जाण्यास निघाले. मीर आलम व त्याचे दोस्त तेथे आले व त्यांनी गांधीजींना खूप बडविलें. गांधीजी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडले. रस्त्याने जाणाऱ्या गोऱ्या लोकांनी त्या पठाणांना पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. रेव्हरंड डोक या नांवाचे एक दयाळू मिशनरी मित्र होते. त्यांनी गांधीजींना आपल्या घरी नेले आणि एका डॉक्टरला बोलावून त्यांचेवर उपचार करविले.

शुद्धीवर येताच, गांधीजींनी परवान्याचा कागद मागविला आणि त्यावर सही केली. नंतर त्यांनी पोलिसांना तारेने कळविले कीं, "मीर आलम वगैरे लोकांवर खटला भरण्याची मला इच्छा नाहीं."

गांधीजींची निर्भयता, अपकाराची फेड उपकाराने करण्याची त्यांची वृत्ती आणि त्यांचा दृढनिश्चय या सर्वांचा, तेथे जमलेल्या लोकांवर, विलक्षण परिणाम झाला.

नंतर डॉक्टराने गांधीजींना गप्प राहाण्यास व झोप घेण्यास सांगितले. पण गांधीजी देवाला क्षणभर तरी विसरतील काय? त्यांनी एका चिठ्ठीवर लिहिले, "रेव्ह. डोक यांची लहान मुलगी ऑलिव्ह ही जर, "लीड काइंडली लाईट" हे माझे आवडते भक्ति-गीत गाईल, तर मला फार आनंद वाटेल." त्या मुलीला बोलावण्यांत आले आणि तिने आपल्या मधुर स्वराने ते भक्ति-गीत म्हटले. त्यामुळे गांधीजींचे मन शांत झाले आणि ते झोपी गेले.

पांच वर्षानंतर, एकदां गांधीजी भाषण करीत होते. कांहीं मुसलमान खवळले आणि गांधीजींवर हल्ला करू लागले. तेव्हां एक धिप्पाड माणूस हातात सुरा घेऊन गांधीजींच्या मागे उभा राहिला आणि गरजला, "गांधीभाईना हात लावण्यास जो धजेल, त्या माणसाचा मी मुडदा पाडीन."

हल्लेखोर पळून गेले.

आपल्या रक्षणासाठीं ईश्वराने कोण वाली पाठविला, हे पाहाण्यासाठीं गांधीजींनी मागे बघितले, तर—तोच मीर आलम!



"तुझं दुःख हें माझें दुःख!"

# गाढ सहानुभूति

९२५८२

दक्षिण आफ्रिकेंतील दलित हिंदी लोक, गांधीजींच्या नेतृत्वाने चाललल्या सत्याग्रहांत, हजारोंच्या संख्येने सामील झाले, पुष्कळजणांनी तुरुंगवास सोसला आणि कांही तर प्राणास मुकले. कस्तुरबाहि तुरुंगात गेल्या. तेथून त्या सुटून आल्या, तेव्हां त्या अस्थिपंजर होत्या. जेव्हां गांधीजींनी त्यांना घरी नेले, तेव्हां त्यांना तेथे प्रचंड समुदाय जमलेला आढळला—"गांधी-राजाचे" दर्शन घेण्यासाठीं ते लोक थांबले होते. त्यांच्यापैकी कांहीं स्त्रिया आक्रोश करीत होत्या. कारण त्यांचे पति, पुत्र वा बंधू सत्याग्रहांत कामास आले होते.

गरीब लोकांमध्ये मोकळेपणाने मिसळता यावे, म्हणून गांधीजींनी साधा सदरा व लहानसे धोतर परिधान केले होते. तशा वेषांत गांधीजी त्यांचेकडे गेले. त्यांच्या डोळ्यांत अपार करुणा भरलेली होती—बुद्धाचा नवा अवतार ते भासत होते. सर्वजण आदराने उभे राहिले. स्त्रियांना आपल्या भावना आवरेनात. एका तरुण स्त्रीचा नवरा गमावला होता, तिने त्यांच्या पायावर लोळण घेतली. गांधीजी खाली वाकले आणि अत्यंत प्रेमभरानें त्यांनी तिला वर उचलले. तिच्या खांद्यावर आपले दोनहि हात ठेवून आणि तिच्या अश्रुपूर्ण नेत्रांवर आपले डोळे खिळवून, ते निःस्तब्धपणे उभे राहिले. हे दैवी दृश्य पहाताना सारेजण निश्चल राहिले—स्तब्ध राहिले.

गांधीजींच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. गहिंवरलेल्या स्वराने ते म्हणाले, "छे, छे. तूं रडू नकोस, तुझ्या वैधव्याला मी कारण आहे, मी तुझी क्षमा मागतो. तुझा पति अमर झाला आहे. कारण राष्ट्रसेवा करतां करतां जुलमी अधिकाऱ्यांकडून तो मारला गेला आहे!' असें म्हणून त्यांनी त्या विधवेचे अश्रू पुसले आणि तिला प्रणाम केला. नंतर इतरांचे सांत्वन करण्यासाठीं ते गेले.

दुःखी व दलित लोक हे गांधीजींना आपले वाटत आणि ते त्यांच्यावर प्रेम करीत. अशा सज्जनांचे वर्णन करतांना, तुकोबांनीं म्हटलें आहे—

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचे चित्त ॥
ज्यासि अपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥



लाखो उघड्या लोकासाठी

# दरिद्र नारायणाचा भक्त

दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यांत गांधीजी विजयी झाले. हिंदी लोक त्यांना "कर्मवीर" म्हणू लागले. पण त्या कर्मवीराच्या पराक्रमाचा हा केवळ श्रीगणेशा होता. ते भारतांत परत आले.

आपल्या प्रिय मातृभूमिपुढे भयानक अज्ञान, दारिद्र व दैन्य उभे आहे, असे त्यांना येथे दिसले. ते पाहून त्यांचे अंतःकरण फाटून गेले. ब्रिटिश राज्याच्या शृंखलातून हा देश मुक्त झाला तरच भारताचे दैन्य संपेल, असे त्यांना कळून आले. लाखो हिंदी लोकांना दिवसातून एकहि वेळ पोटभर जेवण मिळत नाहीं, असे त्यांना दिसून आले. त्यांच्या दरिद्री झोपड्यांत त्यांनी चरखा नेऊन ठेवला. त्यावरील सुताची खादी त्यांनी विणून घेतली आणि लोकांना खादी वापरण्यास प्रवृत्त केले. या प्रकारे त्यांनी कैक उपाशी पोटांना खाऊ घातले. एकदां सूतकताई करणाऱ्या कांहीं स्त्रिया गांधीजींना भेटण्यास आल्या. त्यांचे कपडे गलिच्छ व घाणेरडे होते. त्यांच्या घरीं जाऊन त्यांना स्वच्छतेचे धडे देण्यास गांधीजींनी कस्तुरबांना सुचविले. कस्तुरबा त्यांच्या झोपड्यांत गेल्या. तेथे त्यांना हृदय-विदारक दृश्य दिसले. कांहीं स्त्रियांना वापरण्यासाठीं एकच लुगडे होते, आणि कांहींजणींपैकी दोन-तीन स्त्रियांत मिळून एक लुगडे होते. त्यांच्यापैकीं एकजण बाहेर गेली, म्हणजे बाकीच्या दोघींना घरीच रहावे लागे.

ही स्थिती कस्तुरबांनी गांधीजींना सांगितली. ती ऐकून त्यांचे अंतःकरण सहानुभूतिने कळवळले. त्यांनी आपला सदरा, आपली टोपी आणि आपले धोतर टाकून दिले आणि फक्त लुंगी वापरण्याचे ठरविले—क्वचित् ते उपरणें वापरीत.

इंग्लंडमध्ये गेले तरी त्यांचा पोषाक हाच होता—पाणी गोठून त्याचे बर्फ होण्याइतकी कडाक्याची थंडी तेव्हां तेथे होती.

इंग्लंडच्या राजाने गांधीजींना भेटीस बोलावले. राजाच्या भेटीस जाणाऱ्या माणसाने विशिष्ट तऱ्हेचा पोषाक करावा, अशी तेथें प्रथा होती. पण गांधीजी म्हणाले, "मला माझ्या नेहमीच्या पोषाकांत जाता येत नसेल, तर मी राजे-साहेबांना भेटणार नाहीं." आपल्या उघड्या-वाघड्या देशबांधवांविषयी सहानुभूति दाखविण्यासाठीं त्यांनी कमरेला फक्त पंचा गुंडाळण्याचे व्रत घेतले होते. अखेर राजाला नमते घ्यावे लागले. ब्रिटिश राजाच्या त्या वैभवशाली प्रासादांत, उत्तम पोषाक केलेल्या दरबारी लोकांच्या मेळाव्यांत, केवळ लुंगी व उपरणें परिधान करुन, गांधीजी गेले. प्राचीन काळीं सम्राटाच्या भव्य दरबारांत एकादा ऋषी जात असे, तसे हे दृश्य दिसले.



महारोग्यांची सेवा करतांना

७६६०१ बा. वा. ३६५८ ३०।३।५८

# आजाऱ्याची सेवा

भारतात प्रथम अहमदाबाद येथे व नंतर वर्ध्याजवळील सेवाग्राम येथे गांधीजींनी आश्रम स्थापन केले. त्यांत नेहमी पुष्कळ कार्यकर्ते असत. आजाऱ्यांची अंथरुणें रिकामी कधीच नसत. आजाऱ्यांची सेवा स्वतः गांधीजी अत्यंत काळजीने व प्रेमाने करीत. महत्वाच्या घडामोडी चालू असल्या, तरी गांधीजी आपली सेवा-शुश्रूषेची वेळ कधींहि चुकवीत नसत.

एके दिवशी गांधीजी इतर पुढाऱ्यांबरोबर एका महत्वाच्या प्रश्नाची चर्चा करीत होते. चर्चा चालू असतानाच त्यांनी आपले घड्याळ पाहिले—आणि ते एकदम उठले. जवाहरलाल त्रस्त झाले आणि म्हणाले, "बापू, आपल्या देशां-तील लाखो लोकांचे कल्याण या प्रश्नावर अवलंबून आहे. असे असताना एका आजारी माणसाची काळजी घेण्यासाठीं ही चर्चा अर्धवट सोडून कां जातां? साऱ्या राष्ट्रापेक्षां त्याचे महत्व अधिक आहे काय?"

"अर्थात्—निदान माझ्या दृष्टीने." गांधीजींनी उत्तर दिले.

एकदा राजकारणाच्या गंभीर प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं व्हाईसरायने गांधीजींना बोलाविले. ती चर्चा संपताच गांधीजी म्हणाले, "आतां मला आपला निरोप घेतलाच पाहिजे. माझे रुग्ण माझी वाट पहात असतील."


मानवांची सेवा—विशेषतः शारीरिक व मानसिक दृष्ट्या पंगु असलेल्यांची सेवा—गांधीजींना ईश्वराची प्रार्थना वाटे. स्वतःचे प्राण देऊनहि मानवाची सेवा करणें, हा पण भक्तीचाच प्रकार होय असे ते मानीत. खऱ्या भक्ताला मृत्यूचे भय कधीच वाटत नाही. एखाद्या दैवी दाईप्रमाणे ते रुग्णाची सेवा करीत. संसर्ग बाधण्याची भीति त्यांना कधीच वाटत नसे. कुष्ठ—रोगासारख्या भयंकर रोगाने पछाडलेल्या आजारी माणसाचे रक्त व पू ते आपल्या स्वतःच्या हातांनी धूत आणि जखमांवर नव्या पट्ट्या बांधीत. एखाद-दुसरा चुटका सांगून ते त्यांना उल्हसित करीत आणि त्यांचे दुःख कमी करण्याचे सर्व प्रयत्न करीत. त्यांच्या आहारासंबंधी ते तपशिलवार सूचना काळजीपूर्वक देत, आणि त्या अमलांत आल्या की नाहीत हे पाहात.

असे होते 'बापूजी'—रोगी-निरोगी, राव-रंक अशा सर्वांचे पिताजी.

बापूंना भेटण्यास कोणता रुग्ण उत्सुक नसेल? आणि बापूंहि आपल्या रुग्णांच्या अंथरुणाजवळ उत्कंठेने धावत जात—एखादा भक्त मंदिरात जातो तसे.



बापू व बा — सेवाग्राम येथे



अहिंसेचे प्रणेते
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. ..92५७२.. नों दि ...........
वि. का.वा. ... क्र. ..................

४९

धन्य हो...

सर्व देशांत लोक त्यांना बा (राष्ट्र-माता) व बापू (राष्ट्र-पिता) असें म्हणत.

यत, ।क७

.. गांधीजींना येण्यास थोडा उशीर ... माजाला वंदन
...ून झपाझप येत असलेले त्यांना दिसले. गांधीजींच्या प्रशांत व मस्मित मुद्रे-
। ०जारों ... पुरुष टक लावून पाहात आहेत, तोच एकाएकी तीन गोळ्या झाडल्या गेल्या. जवळचे लोक दचकले. मुखाने रामनाम घेत व हात जोडलेले असताना, गांधीजी जमिनीवर पडत असलेले
। दिसले. गांधीजींचे प्राण घेण्याचा प्रयत्न झाला, अशी बातमी पसरली! सारे सुन्न झाले!

खुनी माणूस हिंदी होता—गांधीजी हिंदूवर अन्याय करीत आहे, अशी समजूत असणाऱ्यापैकी तो होता.

गांधीजींच्या अंतःकरणांत राम-नाम इतके कोरलेले होते कीं, अकस्मात गोळ्या लागल्यामुळे अंत ण्यापूर्वी, त्यांच्या तोंडून अखेरचे जे शब्द बाहेर पडले, ते म्हणजे—"हे राम!"

"राम-भक्त अजी राम-सदनि गेला" असें एका हिंदु कवीने म्हटले.

एका दृष्टीने पहाता, गांधीजींना जसा मृत्यु यावा अशी इच्छा होती, तसाच तो आला. त्या दिवशी काळीच त्यांनी आपल्या पणतीला——मनुबेनला—असे म्हटले होते, "मला जर कोणी गोळी घालून गली पाडले, आणि छाती पुढे करून मी जर त्या गोळ्या खाल्या व दुःखाने न विव्हळता, मी जर राम-ामच घेत राहिलो, तरच तू म्हणावेस, "हा खरा महात्मा."

हे शब्द किती भविष्यवादी ठरले—आणि किती अल्पावधीतच!

★

पुराण-काळांतील एक राक्षस हिरण्यकश्यपु याने देवांकडून असा वर मिळविला होता कीं, त्यामुळे ाला मृत्यु येणे जवळजवळ अशक्य व्हावे. "मला मानवाने मारु नये किंवा पशूने मारु नये, मला दिवसा रण येऊ नये किंवा रात्रीं येऊ नये. इ." असा वर त्याने मागितला. म्हणून ईश्वर नरसिंहाच्या रुपाने सायं-ाळच्या वेळी आला आणि त्याने त्याला ठार केले. त्याचप्रमाणें ब्रिटिश सरकारने हिंदी लोकांना निशस्त्र रून, दीन-दुबळे बनवून आणि त्यांची बुद्धि भ्रष्ट करुन, भारतावर यावच्चंद्र-दिवाकरौ राज्य करण्याचे योजिले ते. पण ईश्वराने दया दाखविली आणि गांधीजींना निर्माण केले. त्यांनी अहिंसेचे व आत्मक्लेशाचे अगदी भिनव शस्त्र शोधून काढले आणि त्यायोगे अगदी अपूर्व पद्धतीने स्वातंत्र्य संपादन केले.

ा कृतिशील विभूतीच्या नियोजित जीवित-कार्याची सांगता झाली, आणि या भू-तलावरील त्यांचे मात्त झाले.

ांधीजींच्या आकस्मिक आणि शोककारक मृत्यूची बातमी कानी पडली, तेव्हां सर्व देशांतील—एवढेच सर्व जगांतील-लोकांना धक्का बसला. या महात्म्याला अभिवादन करणारे आणि त्याच्या अनुयायांचे रणारे संदेश जगाच्या कोनाकोपऱ्यांतून आले.

# राष्ट्र-माता व राष्ट्र-पिता

गांधीजींचे जीवन किती वादळी स्वरुपाचे होते आणि त्यागाने भरलेले होते, हे आपण पाहिले आहे. त्यांचा मार्ग काटेरी होता, पण ते सस्मित मुद्रेने त्या मार्गावरुन नेहमी चालत जात. पण ते एकटे नव्हते. कस्तुरबा त्यांच्या—सन्निध सदासर्वदा असत. त्याहि त्याच कंटकमय मार्गाने गेल्या. शारीरिक त्रासाशिवाय त्यांना मानसिक यातनाहि भोगाव्या लागत. गांधीजींची दिव्यें चालूच असत. ते म्हणत. "कस्तुरबा फार शूर आहे. तिच्या जागी दुसरी कोणती स्त्री असती तर ती केव्हांच कोसळली असती."

महादेव देसाई हे गांधीजींचे खासगी चिटणीस होते. त्यांची गांधीजींवर अपार निष्ठा आणि भक्ति होती. तरी पण एकदां अशी परिस्थिति निर्माण झाली कीं, ते मोठ्या दुःखानें म्हणाले,

"स्वर्गी संत-समागम कीर्ति देई।
इहलोकीं परि तो तापद होई॥

कोवळ्या वयांत, १३ वे वर्षी, कस्तुरबांचे गांधीजींशी लग्न झाले. पुरी साठ वर्षें त्या गांधीजींच्या सतत सहचारिणी होत्या. त्यांना किती भयंकर दिव्यांतून जावे लागले असेल! पण त्या क्षमेची मूर्ति होत्या. आपल्या यातनासंबंधी त्यांनी कधीच कुरकूर केली नाहीं आणि आपल्या त्यागासंबंधी त्यांनी कधी ब्र उच्चारला नाहीं. गांधीजींना सुख देण्यांत त्यांना आनंद व संतोष वाटत असे. त्यांच्या सर्व कार्यांत त्या त्यांना जीवाभावाने मदत करीत. गांधीजींचे त्यांच्यावर अगाध प्रेम होते. त्यामुळे त्यांची सारी दुःखें बोथट होत, आणि त्या तीं लीलेने सहन करीत.

कस्तुरबांनी आपल्या सर्व कार्यांत आपल्याला पाठिंबा द्यावा, अशी गांधीजींनाहि तीव्र इच्छा असे. ते म्हणत, "अनत्याचारी असहकारितेच्या शास्त्रांतील व व्यवहारातील माझ्या गुरु 'बा' होत." दक्षिण आफ्रिकेंतील पुरुषांना तुरुंगातील हाल असह्य वाटत—आणि स्त्रियांनी तर तुरुंगात जाण्यास सुरवातहि केली नव्हती. अशा वेळी कस्तुरबा पहिली स्त्री–सत्याग्रही म्हणून तुरुंगात गेल्या. भारतात परत आल्यावर त्यांनीहि पुष्कळ वेळा तुरुंगवास सोसला.

कस्तुरबासारखी योग्य सहचारिणी मिळाल्यामुळे गांधीजी किती धन्य होत!

सर्व देशांत लोक त्यांना बा (राष्ट्र-माता) व बापू (राष्ट्र-पिता) असें म्हणत.



निरोप घेताना

# गोलमेज परिषदेंत

ब्रिटिशांच्या पंज्यातून भारताला मुक्त करणें ही सोपी गोष्ट नव्हती. म्हणून गांधीजींनी "सत्याग्रहाची" प्रभावी चळवळ सुरु केली. १९३० सालीं सत्याग्रहाने मिठाच्या कायदेभंगाचे स्वरूप धारण केले. ७९ अनुयायांसह गांधीजी साबरमतीहून पायीं निघाले आणि दांडी या छोट्याशा बंदरावर त्यांची पदयात्रा जाऊन पोचली. तेथील किनाऱ्यावर त्यांनी स्वतः मीठ तयार केले. इतिहास-प्रसिद्ध अशा या दांडी-यात्रेंत गांधीजी वाटेवरील खेड्यांत थांबत होते आणि सत्याग्रहांत सामील होण्यासाठीं तेथील जनतेला हाक देत होते. आपल्या लोकांनी त्यांना उत्साहाने पाठिंबा दिला, हाल सोसले आणि आपल्या जिवाची तमा न बाळगता धैर्याने लढा चालविला. शेवटी इंग्रज राज्यकर्त्यांना समेट करणें शहाणपणाचे वाटले. त्यांनी गांधीजींना लंडन येथें गोलमेज परिषदेस हजर राहण्यासाठीं बोलावले.

ब्रिटिशांच्या अविश्वासू वर्तनाचा अनुभव गांधीजींना पूर्वी होता. गांधीजींनीं ब्रिटिशांवर विश्वास कां ठेवावा, असा प्रश्नहि कांहीं लोक विचारीत होते. पण गांधीजी उच्च तत्वाने चालणारे गृहस्थ होते. एखाद्या सत्यनिष्ठ असू शकणाऱ्या माणसावर अविश्वास ठेवण्यापेक्षां दुसऱ्यावर विश्वास ठेवून आपण हजारदा फसलेले चांगले, असे ते मानीत. त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविले.

पुष्कळ लोकांनीं गांधीजींना इशारे दिले. पण त्यांना वाटे, "वागू द्यात ते खोटेपणाने, करू देत ते माझे अपमान, रिक्त-हस्ताने मी परत गेलो तर माझे देशबांधव माझा तिरस्कार करोत. पण मला ब्रिटिशांनी बोलावले आहे, म्हणून त्यांचेवर पूर्ण विश्वास ठेवून मी तिकडे गेले पाहिजे. माझा सत्य-धर्म मला हेच सांगत आहे." त्यांनी आपला निश्चय ठाम केला आणि ता. २० ऑगस्ट १९३१ रोजी "राजपुताना" बोटीने ते भारतांतून निघाले.

भारताच्या किनाऱ्यापासून त्यांची बोट जसजसी दूर जात चालली, तसतसे ते आपल्या प्रिय मातृभूमीच्या किनाऱ्याकडे, नजर पोचत होती तोपर्यंत, पहात राहिले. आपली मातृभूमि अधिकाधिक क्षीण होत आहे असे त्यांना दिसले. किनाऱ्यावर हजारो लोक आपल्या 'बापूंना' प्रेमाचा निरोप देण्यासाठीं जमले होते आणि मनांत गुणगुणत होते—

"पिऊन टाक तू अखेरचा जहरी प्याला."



आपद्ग्रस्ताबरोबर

# लंडनमधील कामगारांमध्ये

ब्रिटिश सरकारने गांधीजींची रहाण्याची व्यवस्था लंडनमध्ये एका राजेशाही इमारतींत केली होती. पण तो दीन-बंधू तेथे कसा राहील? मिस् म्युरेल लिस्टर या बाईच्या 'दीन-सदनांत' रहाण्याचे त्यांनी पसंत केले. लंडनच्या पूर्व-भागांत गिरणी-कामगार रहात होते, असा तो विभाग होता.

गांधीजींची कामाची गडबड फारच होती. तरी ते वेळांत वेळ काढून त्या कामगारांच्या घरी जाऊन त्यांना भेटत. खादीचा शुभ्र पोषाख केलेला देवदूतच जणूं भेटावयास आला आहे, अशा भावनेने तेथील लोकांचे सारे वातावरण आनंदाने भरुन जाई.


गांधीजी अत्यंत साधेपणाने रहात. भारतांतील लाखों लोकांचे एकमेव प्रतिनिधी म्हणून त्यांच्या शिरावर फार मोठी जबाबदारी होती. तरी त्यांची मुद्रा सदैव सस्मित असे. इंग्लंडच्या हिवाळ्यांतील कडाक्याच्या थंडीतहि केवळ लुंगी लावून व लोकरी शाल पांघरून ते वावरत. याचा परिणाम तेथील सर्व लोकांवर विलक्षण झाला.

मिस् म्युरेल लिस्टर यांच्यावर तर गांधीजींचा परिणाम इतका झाला कीं, त्या मनांतल्या मनांत गांधीजींची तुलना साक्षात् येशू-ख्रिस्ताशी करू लागल्या. त्यांनी स्वतःच लिहिलेला एक प्रसंग असा—

दर शनिवारी रात्री किंग्स्ले हॉलमध्ये "आनंदाची रात्र" साजरी होई. तेव्हां स्त्री-पुरुषांची गर्दी होई. ते मजा मारीत असत... शक्य तेव्हां गांधीजी तेथे येत. घरीं असण्याचा त्यांचा पहिला दिवस शनिवार होता. त्या दिवशी संध्याकाळी गडबड व मैत्रीची भावना यांना पूर आला होता. पियानो-मागील ओक लाकडाचा दरवाजा उघडला आणि पांच खादीधारी व्यक्ति आंत आल्या. त्यांच्यामध्ये गांधीजी होते. त्यांनी ते दृश्य पाहिले. ते दृश्य दिसायला मोठे सुंदर होते. (ते दृश्य पाहून मला) त्या हॉलच्या ध्येयवाक्याची आठवण झाली.

"जेथे जातो तेथे माझी भावंडे दिसतात."

थोडा वेळाने मी म्हटले, "या आणि आपल्या आंधळ्या मित्रांशी बोला." ते माझ्या मागोमाग येऊ लागले, तेव्हां संगीत विरले...बायबलमधील देखावाच आपण पहात आहोत, असे प्रत्येकाला वाटू लागले. एका आंधळ्या बाईबरोबर ते बोलू लागले. तेव्हां बाकीची माणसें अत्यंत हळूवारपणें व शांतपणें त्यांचेजवळ आली. त्यांच्यापैकी पुष्कळजणी तरुण माता होत्या—त्या पुढे आल्या आणि गांधीजीना स्पर्श करावा, म्हणून आपल्या कडेवरील अर्भकांना त्यांनी पुढे केले. गांधींजींनी सर्वांना अभिवादन केले आणि एका अर्भकाला आपल्या हातांत घेतले. त्या रात्रीं, त्या साऱ्या सभागृहांत, नीरव शांतता पसरली होती.



चरखा — संजीवनी-मंत्र

# विषाचा प्याला

गोलमेज परिषदेचा शेवटचा दिवस उजाडला. गांधीजींनी भारताच्या दैन्यावस्थेवर हृदय-द्रावक भाषण केले. भारताला सध्याच्या दुर्दशेंत लोटणाऱ्या ब्रिटिश सरकारने भारताला स्वातंत्र्य द्यावे, अशी विनंती त्यांनी केली. तिला सरकारने उत्तर काय दिले? भारताला खरे स्वातंत्र्य देण्याची प्रामाणिक इच्छाच त्या सरकारला नव्हती. गोलमेज परिषद हा केवळ एक देखावा होता. भारताची नजरबंदी करण्यासाठीं त्या सरकारने शेवटी एक मोघम पत्रक काढले.

अशी अखेर झाली. समेटाच्या साऱ्या आशा उध्वस्त झाल्या. अन्याय व अपमान यांच्या विषाचा घोट, हिंदी जनतेला वाटत होते त्याप्रमाणे, गांधीजींना घ्यावा लागला.

गांधीजींची प्रतिक्रिया काय होती याची कल्पना तुम्ही करु शकता? ते निराश झाले काय? भगवान शंकराप्रमाणे, ते असे विषाचे प्याले पूर्वी किती तरी प्याले होते. ईश्वरावर श्रद्धा ठेवणारा माणूस कधीही आशा सोडीत नाहीं.

परिषदेच्या सभागृहांतून आपल्या निवासस्थानी परत येताच, गांधीजी शेकोटीपाशी बसले, त्यांनी आपला चरखा काढला आणि त्याच्यावर ते सूत कातू लागले. त्या खोलीच्या एका दूरच्या कोपऱ्यांत, मिस् आगाथा हॅरिसन ही इंग्रज महिला बसली होती. गांधीजींची चित्त-शांती पाहून ती चकित झाली. तिने लिहिले आहे—

"गांधीजी परत आले, शांतपणे खाली बसले, त्यांनी आपला चरखा काढला आणि त्यावर सूत काढण्यासाठी ते शेकोटीपाशी बसले. सर्व जगाचा भार आपल्या खांद्यावर घेऊन चालणाऱ्या अॅटलासची एक दंतकथा आहे. त्या-सारखे गांधीजी मला दिसले."

या अत्यंत प्रचंड पण दुर्बल अशा राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी निर्लज्ज, जुलमी व सामर्थ्यशाली अशा ब्रिटिश साम्राज्याशी टक्कर देण्याचे कार्य, जसे अॅटलासचे आहे, तसेच हर्क्युलसचेहि खचित आहे...

गांधीजींच्या दृष्टीने पहाता, सूत कातावयास बसले कीं पारतंत्र्याचा भार नाहींसा होईल. भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं चरखा शस्त्र आहे, असें त्यांना वाटे. एखादा भक्त आपल्या माळेचे मणी जसे ओढतो, तसे गांधीजी चरख्याच्या फेऱ्याकडे पहात. ते म्हणत, "या चक्रांत मला माझ्या रामाचे दर्शन होते."



"आपल्या भेटीनं आनंद होतो"

# इतिहासप्रसिद्ध उपवास

पूर्वी हिंदू लोक आपल्या कांहीं धर्म-बांधवांना स्पर्श करीत नसत. ते त्यांना अस्पृश्य म्हणत. या अस्पृश्यांच्या मुलांना शाळांमध्यें ते आपल्या मुलांबरोबर बसू देत नसत—आणि इतरहि पुष्कळ अपमान त्यांचे होत. गांधीजींना याचा धक्का बसला. "आपण हिंदू केवढे पाप करीत आहोत!" असे त्यांना वाटलें. हे पाप नष्ट करण्याचा त्यांनी निर्धार केला आणि आपल्या आश्रमांत एका "अपृस्श्य" कुटुंबाला घेतले. "अस्पृश्य" हे नांव बदलून त्यांना ते "हरिजन" म्हणू लागले. हिंदू समाजात मोठी खळबळ उडाली. पण गांधीजी दृढ राहिले आणि अस्पृश्यतेच्या पापाची जाणीव हिंदू लोकांच्या मनाला देत राहिले.

गोलमेज परिषदेंत. मताधिकार देण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. एक हरिजन पुढारी डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठीं स्वतंत्र मतदार-संघाची मागणी केली. गांधीजी म्हणाले, "अस्पृश्य हे हिंदू आहेत. स्वतंत्र-मतदार संघ त्यांना दिल्याने कायमची फूट पडेल आणि ती खुद्द हरिजनांना घातक ठरेल." त्यांनी ब्रिटिशांना इशारा दिला, "सार्‍या जगाचे राज्य मिळत असले तरी मी हरिजनांच्या हक्कांचा सौदा करणार नाहीं....अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासंबंधी जे बोलतात त्यांना भारत माहीत नाहीं आणि आजचा भारतीय समाज कसा घडलेला आहे, हेहि माहीत नाहीं. म्हणून माझ्याजवळ असेल त्या सर्व शक्तिनिशी मी असे सांगतो कीं, या स्वतंत्र मतदार-संघाला विरोध करणारा मी एकटाच असलो, तरीहि मी माझे प्राण देऊन विरोध करीन."

ब्रिटिश सरकारने डॉ. आंबेडकरांना पाठिंबा दिला. ते अपेक्षितच होते. त्यावेळी गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत होते. म्हणून त्यांनीं अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार-संघाविरुद्ध प्राणांतिक उपोषण आरंभिलें.

ही वार्ता वणव्याप्रमाणें पसरली. गांधीजींना दीर्घायुष्य लाभावें, म्हणून सर्व देशभर प्रार्थना करणार्‍या सभा भरल्या. पुढार्‍यांनी डॉ. आंबेडकरांच्या भेटी घेतल्या आणि समेट करण्याची विनंती केली. असाच समेट ब्रिटिश सरकार मान्य करणार होते.

देशांतील या सर्व खळबळीला कारण असलेले गांधीजी पुण्याजवळील तुरुंगात. एका आम्रवृक्षाखाली, एका खाटेवर. उपवास करीत. शांतपणें पहुडले होते. क्षणाक्षणाला मृत्यु त्यांचे समीप येत होता. कस्तुरबा आणि इतर लोक अगतिकपणें पहात राहिले होते. संत-कवी रवींद्रनाथ टागोर तेथे आले. गांधीजींची मुद्रा आनंदानें विलसू लागली. त्यांनी आपले क्षीण हात पुढे केले आणि त्या कवी-राजाला आपल्या जवळ घेतले आणि ते पुटपुटले, "आपल्या दर्शनाने मला किती आनंद झाला आहे!"

त्याचवेळी तुरुंगाधिकारी, हातात एक सरकारी पत्रक घेऊन. येत असलेला दिसला. त्या पत्रकांत सरकारनें समेटाला संमति दिलेली होती. सर्व विरोधी पक्षांनी शेवटी तो समेट घडवून आणला होता. गांधीजींना तो समेट संतोषदायक वाटला.

कविवरांनी एक सुंदर भक्तिगीत गाइले आणि कस्तुरबांनी गांधीजींच्या हाती सरबताचा पेला दिला.

हा इतिहास-प्रसिद्ध उपवास असा संपला.



मंदिर – प्रवेश

# हरिजनांना मंदिर-प्रवेश

ईश्वर सर्वत्र आहे. आपल्या इच्छेप्रमाणें आपण कोठेहि त्याचे ध्यान करू शकतो—त्याची प्रार्थना करू शकतो. तरीहि हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे सर्व धर्मांचे लोक आपापली पूजा-स्थानें बांधीत असतात. तुम्हीदेखील तेथे गेला असाल.

हिंदूंच्या मंदिरात हरिजनांना पूर्वी प्रवेश नसे, हे तुम्हाला माहीत आहे काय? आपल्या हिंदु देव-देवतांची पूजा ते करीत असले, तरी आपण त्यांना मंदिराजवळ येऊ देत नव्हतो. केवढा हा अन्याय!

मंदिरांत आपण कीर्तन-प्रवचने ठेवतो, भजनें म्हणतो, धार्मिक कथा ऐकतो. देवळें व देव सणावारी सुंदरपणे सजविले जातात. पण हरिजनांना हे सर्व मना होते. देवळाच्या दारापाशी जाण्याचीहि मुभा त्यांना नव्हती, मग ते त्या धार्मिक समारंभात भाग कसा घेणार?


हरिजनांना अशा रीतीने तुच्छ लेखणें हा हिंदुधर्मावरील एक कलंक आहे, असे गांधीजींना वाटले आणि म्हणून ते हिंदु जनतेला सांगू लागले, "आपल्या देवळांत हरिजनांना मुक्तद्वार असले पाहिजे."

पुष्कळ मंदिरांचे पुजारी व पंडित स्वतःला विद्वान समजत. ते संतप्त झाले. कांहींजण गांधीजींकडे वाटाघाटीसाठीं गेले. गांधीजी त्यांना एकच गोष्ट सांगत, "वेद, उपनिषदें व गीता यांनी आपल्याला आपल्या बांधवांना दूर ठेवण्यास कधीच शिकविले नाहीं."

गांधीजींनी हरिजनांच्या बाजूने अंतःकरणापासून लिहिण्या-बोलण्याचा सपाटा लावला. या त्यांच्या लेखा-भाषणांनी हिंदूंच्या अंतःकरणाला स्पर्श केला. आणि एकएका मंदिराची दारें हरिजनांना खुली झाली.

तुकोबांनीं म्हटले आहे—

अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेची वचनें । व्हावे नारायणें उतावीळ ॥धृ॥
मागेंपुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥२॥
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला माय-बापा ॥३॥
उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य जालें ॥४॥
तुका म्हणे आतां करी कृपा-दान । पाउलें समान दावीं डोळां ॥५॥



इतिहास-प्रसिद्ध आदेश

# "चले जाव"

ते १९४२ चे संस्मरणीय वर्ष! आणि तो ऑगस्टचा महिना!

दुसऱ्या महायुद्धासंबंधी हिंदी जनतेचे धोरण काय असावे, हे निश्चित करण्यासाठीं मुंबई येथे नेते जमणार होते. भारताच्या स्वातंत्र्य-युद्धातील सुप्रसिद्ध सेनापति—गांधीजी, जवाहरलाल, वल्लभभाई, सरोजिनी नायडू, अब्दुल कलम आझाम इत्यादि—मुंबईत आले होते. भारतीय जनतेचें सार-सर्वस्व तेथे एकत्र झाले होते. राष्ट्राच्या स्वातंत्र्य-युद्धांत पूर्णत्वाने भाग घेतलेल्या मुंबईतील हजारों लोक तेथे जमले होते. बेसुमार गडबड व गोंधळ माजला होता.

अकस्मात, अशी शांतता पसरली कीं टाचणी पडली तरी तिचा आवाज ऐकू यावा. गांधीजी व्यासपीठावर आले होते आणि दीपस्तंभाप्रमाणे उभे राहिले होते. जमलेल्या लोकांना हात जोडून अभिवादन करुन त्यांनी आपल्या भाषणास सुरवात केली. त्यांच्या भाषणास आशय असा—

"आपण फार काळ वाट पाहिली. भारतीय जनतेसाठीं न्याय्य अशी मागणी आपण केली. ती तत्काळ पुरी व्हावयास हवी होती. युद्ध जिकण्यासाठीं इंग्लंड न्यायाने वागत आहे. पण त्याला आपण, आपली मागणी पुरी झाली तरच, मदत करू शकू. आतां पेला काठोकाठ भरला आहे, अस आपण ब्रिटिश सरकारला सांगितले पाहिजे. त्यांनी भारतांतून निघून गेले पाहिजे. ही मागणी पूर्ण करुन घेण्यासाठीं आपल्याला अग्नि-दिव्यांतून जावे लागेल, लोकांना तुरुंगांत जावे लागेल आणि हजारों लोकांना बंदुकीच्या गोळ्यांना बळी जावे लागेल. "करेंगे या मरेंगे" हे आपलें ब्रीद राहील."

गांधीजींना पाठिंबा देणारे तेजस्वी भाषण जवाहरलाल यांनी केले. त्यांच्या-नंतर तशीच आणखीहि भाषणे झाली. त्या सर्वांमुळे जनतेची अंतःकरणें अपार उत्साहाने पेटली.

'चले जाव'च्या ठरावामुळे आणि "करेंगे या मरेंगे" या गांधीजींनी जनतेला दिलेल्या मंत्रामुळे ब्रिटिश सरकार दचकले. जनतेचे पुढारी पकडले तर जनता घाबरून जाईल, अशा कल्पनेने सरकारने गांधीजीप्रभृति नेत्यांना एकदम पकडले.



सहचारिणीचा वियोग

# कस्तुरबाचा मृत्यु

मुंबई येथे ती संस्मरणीय सभा भरल्यानंतर दुसरे दिवशी, कस्तुरबा, महादेवभाई वगैरे लोक भाषणें करणार होते. पण त्यांना पकडण्यांत आले आणि पुणें येथील आगाखान-वाड्यांत आणले गेले. गांधीजींना तेथेच ठेवलेलें होते. ते तिघेजण कैदी म्हणून तेथे एकत्र राहू लागले. पण या तिघांची कायमची ताटातूट करण्याचे दैवाने योजिले. आठ दिवस झाले असतील-नसतील, तोच, महादेवभाई हृदय-विकाराने मरण पावले. आगाखानवाड्याच्या परिसरातच त्या बंदिवानाचे दहन झाले. तेथे एक साधी समाधि बांधण्यांत आली.

या समाधीला कस्तुरबा "महादेवाचे मंदिर" म्हणत, धूप-दीप लावून त्या समाधीची पूजा दररोज करीत आणि ईश्वराची प्रार्थना करीत, "देवा, मलाहि येथेच जागा दे." ईश्वराने त्यांची इच्छा पूर्ण केली. त्या आजारी होत्या आणि त्यांची प्रकृति अधिकच बिघडत चालली. शेवटी १९४४ च्या फेब्रुवारीच्या २२ तारखला, महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी, या महासाध्वीने आपला देह ठेवला. त्यावेळी त्यांचे मस्तक गांधीजींच्या मांडीवर होते आणि त्यांचे कान राम-धून ऐकत होते. आपल्या सहचारिणीसाठीं गांधीजींच्या नेत्रातून दोन अश्रु-बिंदु खाली पडले.

गांधीजींच्या विचाराशी जुळते घेण्यासाठीं कस्तुरबांनी आपली मते बदलली आणि त्याप्रमाणें आपल्या सर्व जीवनाला आकार दिला. गांधीजींचे जीवन कष्टाचे व धावपळीचे. त्यांत गांधीजींना शक्य तितके सुख मिळावे म्हणून कस्तुरबा बारीक-सारीक गोष्टींकडेहि लक्ष पुरवीत. पण जेव्हां त्यांचा अंतकाल समीप आला, तेव्हां त्यांनी कोणती प्रार्थना केली? "प्रभो, मला तुझी भक्ति दे." त्या साध्वीने आपले मन गांधीजींवरून काढून घेतले आणि ईश्वराच्या [illegible]लावले.

कस्तुरबांच्या शवाजवळ गांधीजी पुष्कळ वेळ बसून राहिले. फुलांनी त्यांचे मुखकमल आच्छादिलेले होते आणि त्यामुळे त्या जगदंबा-स्वरूप दिसत होत्या. दक्षिण आफ्रिकेंत, पुष्कळ वर्षांपूर्वी, कस्तुरबा तुरुंगांत गेल्या, तेव्हां गांधीजी म्हणाले होते, "तुला तुरुंगात मरण आले तर जगदंबेप्रमाणें मी तुझी पूजा करीन." गांधीजी कस्तुरबांजवळ बसून राहिले. तेव्हां त्यांना त्या शब्दांचें स्मरण झालें असेल काय?



प्रेमाचा यात्रेकरू

# एकला चलो रे

कस्तुरबांच्या साहचर्यांत गांधींजींनी साठ वर्षे काढली. त्यांच्या निधनानंतर, एका दृष्टीने, ते एकाकी झाले. नोआखली हे पूर्व बंगालमधील एक खेडे—आतां ते पाकिस्तानांत गेलेले आहे. तेथे भयंकर जातीय दंगे उसळले होते. नोआखलीच्या एकाकी पद-यात्रेंत गांधीजींना कस्तुरबांच्या संगतीची जरूरी तीव्रतेने भासली. कांहीं कांहीं वेळा तर त्यांना असें वाटे कीं, बा आपल्याबरोबर आहेतच.

स्वराज्याचा सूर्योदय होण्यापूर्वीच्या गुलामगिरीच्या प्रदीर्घ रात्रींतील तो सर्वांत अंधारा क्षण होता. नोआखलीमधील मुसलमानानी हिंदु-समाजातील अत्यंत दीन-दुर्बल लोकांना अत्यंत क्रूरपणें चिरडण्याचा प्रयत्न चालविला होता. म्हणून दंगे भडकले. तेथील हत्या गांधीजींना सहन होईना.


पुष्कळ वर्षांपूर्वी, दक्षिण-आफ्रिकेंतील फीनिक्स वसाहतीतून भारताकडे येण्यास गांधींजी निघाले असताना, त्या आश्रमांतील एक मुसलमान कार्यकर्ते, इमामसाहेब यांना त्यांनी मोठ्या भावनेने मिठी मारली होती आणि ते म्हणाले होते, "भारतमातेने दोन मुलांना जन्म दिला आहे—एक तुम्ही मुसलमान आणि दुसरा मी हिंदु. आपण सख्खे भाऊ आहोंत." याचे विस्मरण गांधीजींना कधीच झाले नाहीं.

त्रस्त हिंदूना शांत करण्यासाठीं आणि त्यांना मदत करण्यासाठीं, तसेच, खून-जाळपोळीमध्ये गुंतलेल्या मुसलमानांना शांत करण्यासाठीं, गांधीजीनी खेड्याखेडयातून अनवाणी चालत जाण्याचे उग्र तप सुरु केले.

शहात्तर वर्षें वयाच्या या वृद्ध माणसाचे तपाने कृश झालेले शरीर पाहून कोणाच्या भावना उचंबळून आल्या नसतील? हातात फक्त काठी घेऊन, नोआखलीतील डोंगराळ मुलूख आणि रानें, पायीं तुडवित जाणाऱ्या आणि बांबूच्या निरुंद व निसरड्या पुलावरुन ओढे तरून जाणाऱ्या त्या मूर्तीकडे पाहून कोणाच्या हृदयांत पुढील गीत गुणगुणले गेले नसेल—

"एकला चलो रे."

गांधीजींच्या या मैत्री-यात्रेने असंख्य मुसलमानांची अंतःकरणें जिंकली गेली आणि त्यांनी हिंदूचे आपापल्या घरी पुनर्वसन होण्यास मदत केली. त्या गांजलेल्या प्रदेशांत शांतता पुनः प्रस्थापित झाली.



स्वातंत्र्य-प्राप्ति

## भारता[illegible]चा [illegible] [illegible]य-प्राप्ति

[illegible]गांधीजींची नोआखलीतील उग्र [illegible]पश्चर्या जशी फळाला आली, तसेच त्यांनी [illegible]राज्यासाठीं केलेले भगीरथ प्रयत्नहि सफल झाले.

"करेंगे या मरेंगे" या गांधीजींच्या हाकेला जनतेने उत्साहाने साद दिली. स्त्री-पुरुषांनी तुरुंग भरुन वाहू लागले. ब्रिटिशांनी भारत सोडलाच पाहिजे, ही भावना सर्व देशभर वणव्यासारखी पसरली. ब्रिटिश सरकारने काळाची चिन्हें ओळखली आणि भारताला स्वतंत्र करण्याचे ठरविलें. गेली १५०-२०० वर्षे भारताच्या हातात इंग्रजांनी ज्या बेड्या घातल्या होत्या, त्या ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी तोडण्यांत आल्या. पहिला स्वातंत्र्य-दिन जनतेने अपार उत्साहाने साजरा केला.

आपल्या प्राचीन परंपरेचे प्रतीक अशोक-स्तंभ हे आहे. तो अशोक-स्तंभ राज्य-चिन्ह झाला. आणि वैभवशाली तिरंगी ध्वज भारतांत सर्वत्र अभिमानाने फडकू लागला. दिल्लीतील 'लाल किल्ल्यावर' फडकत असलेले व ब्रिटिश सत्तेची खूण असलेले यूनियन जॅक, एखाद्या चिंधीप्रमाणें, खालीं पडले. काळी रात्र संपली आणि स्वातंत्र्याचा सूर्योदय झाला.

यावेळी गांधीजींची मनःस्थिती कशी होती, हे तुम्हाला माहीत आहे काय? त्यांचे मन त्रस्त होते. राष्ट्र स्वतंत्र झाले होते. पण त्याचा एक अवयव कापण्यांत आला होता. त्या अवयवाला आतां म्हणतात—पाकिस्तान. या फाळणीमुळे गांधीजींना परम दुःख झाले. त्यांनी आपला स्वातंत्र्य-दिन उपवास, सूत कताई व प्रार्थना यात घालविला.

त्यावेळी "बापू" कलकत्ता येथे होते. ते स्वराज्याचे जनक. त्यांच्या चरणांवर हजारो लोकांनी फुलें वाहिली—नाणी वाहिली. गांधीजींनी त्या सर्वांना क्षीण स्मित करुन आशीर्वाद दिला. कारण, त्यावेळी त्यांच्या मनांत विचार चालले होते—पाकिस्तानांत राहिलेल्या हिंदूच्या दुःखाचे, भारतांत राहिलेल्या मुसलमानांच्या दुःखाचे आणि पाकिस्तानांतून भारतात व भारतातून पाकिस्तानांत, स्थलांतर करावे लागले, अशा निर्दोष लोकांच्या दुःखाचे.

देशांत हिंदु-मुसलमानांचे ऐक्य असणें अवश्य आहे, हे गांधीजींचे मत कायम होते. जे मुसलमान लोक पाकिस्तानांत पळून जाण्याचा विचार करीत होते, त्यांना भारतांत सुरक्षितता वाटावी आणि जे येथे राहू इच्छित होते, त्यांना आपल्या संरक्षणाची हमी मिळावी, म्हणून गांधीजींनी आपल्या प्राणांची पैज लावली.



अहिंसेचा विजय

IRBK-0112572



अहिंसेचा विजय

IRBK-0112572
IRBK-0112572

# अहिंसेचा चमत्कार

पाकिस्तानांत पुष्कळ हिंदु प्राणास मुकले. त्याचा सूड म्हणून कलकत्यातील हिंदु लोक, मुसलमानांना ठार मारू लागले. स्वराज्याच्या उदयाबरोबर होणारा रक्तपात पाहून, गांधीजींचे अंतःकरण भग्न झाले. कलकत्ता येथे पुनः शांतता नांदणार नसेल, तर प्राणांतिक उपोषण करण्याचे त्यांनी ठरविले.

गांधीजींच्या सार्वजनिक प्रार्थनेमध्ये सर्व धर्मांच्या पवित्र ग्रंथांतील पदें घेतलेली आहेत. प्रार्थनेनंतरच्या आपल्या भाषणांत त्यांनी आपल्या अंतःकरणाची व्यथा प्रकट केली आणि हिंदु-मुसलमानांची हत्या अविचाराने करण्याचे थांबवावे, अशी विनंती केली.

शांततेसाठीं आपले प्राण देण्याची तयारी गांधीजींनी, दधीची ऋषीप्रमाणें, दाखविली. त्याचा परिणाम हिंदूवर विलक्षण झाला. उपोषणामुळे गांधीजी आपल्या खाटेवर क्षीण होऊन पडले होते. जातीय भावनेने भडकलेले कांहीं हिंदु गांधीजींकडे गेले, त्यांनी हात जोडले, आणि आपल्या गुन्ह्यांची कबुली लज्जेच्या सुरांत गांधीजींपुढें दिली आणि त्यांची क्षमा मागितली व उपवास सोडण्याची विनंती केली. त्यांचे म्होरकेहि आले आणि त्यांनी तसेच केले. त्यांनी आपल्या कट्यारी, पिस्तुलें, काडतुसें वगैरे शस्त्रें गांधीजींच्या अंथरुणाजवळ ठेवली. त्या शांतीच्या प्रेषिताला—राष्ट्राच्या त्या प्रिय पित्याला—त्यांनी पुनः पुनः विनंती केली, "उपवास सोडा."

गांधीजींनी त्यांना सांगितले, "तुम्ही आपल्या पापाचे प्रायश्चित म्हणून, मुसलमानांच्या वस्तींत फिरा आणि त्यांची सेवा करा."

अशा प्रकारे ईश्वराने दंगेखोरांच्या अंतःकरणांत प्रवेश केला. पण पुनः दंगें भडकणार नाहींत, याची शाश्वती काय? म्हणून कलकत्ता येथे असलेल्या सर्व राजकीय पक्षांच्या व सर्व पंथांच्या पुढाऱ्यांनी गांधीजींना असे प्रतिज्ञापूर्वक लिहून दिले कीं, या शहरांत शांतता टिकविण्यासाठीं आम्ही प्रयत्न करू आणि जरूर तर, त्याकामी आपले प्राणहि अर्पण करू.

असे अभिवचन मिळाल्यावर गांधीजींनी आपला उपवास सोडला.



रामनाम उच्चारताना

प्रकाशक

मि. पे. झांओवाला,

मंत्री, मुंबओ गांधी स्मारक निधी

मणीभवन, १९, लेबरनम रोड,

गांवदेवी, मुंबओ ७.

प्रथम आवृत्ति

१९६८

किंमत रु. २

मुद्रक

बॉंबे फाओन आर्ट ऑफसेट ॲन्ड लिथो वर्क्स,

मुंबओ २७.